**प्रपत्र सी — ७**

**वृत्तपत्रे, समाजमाध्यमे व पक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यासाठी राजकीय पक्षांकरीता ज्याची उमेदवार म्हणून निवड झालेली आहे, तसेच इतर गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या व्यक्तींची निवड का केली नाही, अशा निवडीच्या कारणांसहित, अशा उमेदवाराबाबतची प्रलंबित फौजदारी खटल्यांसह माहिती**

राजकीय पक्षाचे नाव : **शिवसेना**
निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक — २०२४**
राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे नाव : **महाराष्ट्र**

१) मतदारसंघाचे नाव : **१०१ — जालना विधानसभा**
२) उमेदवाराचे नाव : **अर्जुनराव पंडितराव खोतकर**

| **अ.क्र.** | | |
|---|---|---|
| १ | **पूर्ववर्ती गुन्हेगारी** | |
| | अ. गुन्ह्याचे स्वरूप | **१.** कलम ३०६, २०१, १७१ ई. ३२३, ५०४, ५०६ ३४ भारतीय दंड विधान, ३(१) (VII), ३(२) (V), अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (मा. न्यायालयाने दोषारोप ठेवताना, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ कलम वगळले आहे. जालना नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये पैसे घेऊनही मयताने ठरलेल्या उमेदवारास मतदान केले नाही म्हणून पैशांच्या वसुलीसाठी मयतास धमक्या देऊन तीस आत्महत्येस प्रवृत्त केले. |
| | | **२.** कलम ३, ४ सह ७० प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्ड्रींग ॲक्ट, २००२ (PMLA), महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडुन झालेल्या जालना सहकारी साखर कारखान्याच्या लिलाव प्रक्रियेला कट करुन प्रभावित करुन आपल्या जवळच्या कंपनीला कारखान्याची मालमत्ता मिळवुन दिली. |
| | ब. प्रकरण क्रमांक | १. विशेष खटला (ॲट्रॉसिटी) ११/२००३ |
| | | २. विशेष खटला (PMLA) ४७२/२०२३ |
| | क. न्यायालयाचे नाव | १. प्रथम अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जालना |
| | | २. विशेष न्यायालय (PMLA), मुंबई |
| | ड. दोषरोप निश्चित केले आहेत किंवा नाही (होय / नाही ) | नाही |
| | | नाही |
| | इ. दोषसिद्धीचा दिनांक, असल्यास | निरंक |
| | फ. झालेल्या शिक्षेचा तपशील, असल्यास | निरंक |
| | ग. द्यावयाची आवश्यक इतर कोणतीही माहिती | निरंक |
| २ | उमेदवाराच्या निवडीकरिता कारणे निवड हि उमेदवाराची अर्हता, संपादणूक व गुणवत्तेच्या संदर्भात असेल व केवळ मतदानात "निवडून येण्याची क्षमता" अशी नसेल (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |
| ३ | गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या इतर व्यक्तींची उमेदवार म्हणून निवड का होऊ शकत नाही याची कारणे (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |

**अनु.क्र. २**

उमेदवार वाणिज्य शाखेचा पदवीधर आहे. जालना आणि नजिकच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या समस्यांची उमेदवाराला पूर्ण जाणीव आहे. सर्व समाजातील नागरिकांशी व विशेषतः गोरगरीब जनतेशी सातत्याने संपर्कात असतात. कार्य क्षेत्रात कारखानदारी वाढविण्यासाठी प्रयत्नशील असतात. पूर्व अनुभव व सतत काम करण्याची तयारी असते. आकलन शक्ती चांगली असल्याने प्रशासनाशी समन्वय साधून विकास कामे जलद गतीने करू शकतात. या सर्व बाबींचा विचार करून शिवसेना पक्षातर्फे **श्री. अर्जुनराव पंडितराव खोतकर** यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**अनु.क्र. ३**

उमेदवारावर गुन्हे राजकीय स्वरूपाचे आहेत व जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आंदोलने करण्याबाबतचे आहेत. आर्थिक गुन्ह्याबाबत दोषारोप असला तरी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही किंवा गुन्हा सिद्ध झालेला नाही. अन्य योग्य व अनुभवी उमेदवार या मतदार संघात न आढळल्याने अन्य व्यक्तींची निवड करण्यात आली नाही.

शिवसेना
मध्यवर्ती कार्यालय

**आपला,**

**संजय भाऊराव मोरे**
**शिवसेना सचिव**